महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९/ ४०६७४
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक :- ०३ / १२ / २०१५

# परिपत्रक

विषय : दिनांक १९ जून २०१५ रोजीची अनुपस्थिती **"विशेष नैमित्तिक रजा"** म्हणून मंजूर करणेबाबत.

संदर्भ :सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.विनैसु-१५१५/ २५४/प्र.क्र.२५७/२९, दिनांक २३/११/२०१५.

.....

दिनांक १८ जून २०१५ रोजी मध्यरात्री पासून सुरू झालेल्या पावसामुळे मुंबई व मुंबई उपनगरात रेल्वे वाहतूक दिनांक १९ जून, २०१५ रोजी विस्कळीत झाली. त्यामुळे बहुसंख्य शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत. वाहतूक व्यवस्था बंद पडल्यामुळे बृहन्मुंबईतील राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र. क्र.विनैसु-१५१५/२५४/ प्र.क्र.२५७/२९, दि.२३.११.२०१५ नुसार **"विशेष नैमित्तिक रजा"** मंजूर केली आहे.

२. याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार व्यवस्थापकीय संचालक (मराविविकंम) यांनी, मुंबईमध्ये झालेल्याअतिवृष्टीमुळे जे अधिकारी/कर्मचारी दिनांक १९.०६.२०१५ रोजी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत त्यांना १ दिवसांची "विशेष नैमित्तिक रजा" मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

३. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\O&M\Spl.Holiday.doc